म. ग्रं. ठाणे ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २९६९ दिनांक ३/३/९७
विषय बो. क. क्र. ........

# प्रसाद

इंद्रनील नावाचा एक राजा होता. त्याच्या राणीचे नाव सुमती. दोघेही सुशील, चारित्र्यवान होते. पोटच्या मुलाप्रमाणे आपल्या प्रजेचे ते पालन करीत. त्यामुळे इंद्रनील राजा सर्वांना प्रिय होता. त्याची प्रजाही न्यायाने वागे. भांडणतंटा, हेवेदावे, खून, मारामाऱ्या अशी दुष्कृत्ये कधी घडत नसत. थोडक्यात म्हणजे, इंद्रनीलचे राज्य म्हणजे ऐश्वर्य, सुबत्ता व शांतता यांनी युक्त असे रामराज्य होते.

अशा या प्रजाप्रिय राजाच्या रामराज्यामुळे इंद्रनीलचा लौकिक वाढला होता. प्रजा सुखी तर राजा सुखी. आणि प्रजा सुखी असल्याने राजा खूप समाधानात असायचा. प्रजेच्या हितासाठी सतत धडपडत असायचा.

सुमतीराणी मात्र एका वेगळ्याच चिंतेत वावरत होती. बरीच वर्षे झाली, पण पोटी मूल नव्हते. राज्यकारभाराच्या गडबडीत राजाला
ीव नव्हती. राणी मात्र रात्रंदिवस पोटी मूल नाही
ासे. ह्या चिंतेमुळे तिच्या प्रकृतीवर परिणाम होऊ
आजारी पडू लागली. काही दिवसांनी तर तिने

BVBK-0402969

निरनिराळ्या हकीम-वैद्यांची औषधे सुरू झाली. राजवैद्यांनी राणीच्या

आजाराचे निदान करण्याचा प्रयत्न केला. पण कोणालाच यश येईना. दिवसेंदिवस राणी खंगत चालली. शेवटी तिने बोलणेही सोडून दिले. किलकिल्या डोळ्यांनी ती नुसते पाहत राही.

राणीने बोलणे सोडले तसा तिचा आजार आणखीन बळावत गेला. मनातील दुःख मनातच राहिले की, ते हलके होण्याऐवजी वाढत जाते. राणीची अवस्था तशीच झाली होती. विश्वासू दासदासीजवळही ती काही बोलेना. वृद्ध प्रधानजींनी तिला हरप्रयत्नांनी बोलते करण्याचा प्रयत्न केला. पण तोही निष्फळ ठरला. राजा स्वतः तिच्याजवळ बसे. पण मूकपणाने, भरल्या नजरेने त्याच्याकडे ती पाहत राही. राणी बोलावी, तिने आपले दुःख सांगावे यासाठी राजानेही खूप प्रयत्न केले. पण ते सारे व्यर्थ ठरले. राणी अबोलच राहिली. डोळ्यांतून घळघळ अश्रू मात्र ओघळत राहत. अखेर राजाही थकून गेला. आपल्या शेल्याने राणीचे अश्रू पुसण्याखेरीज अन्य मार्ग नव्हता. आजपर्यंत प्रजेच्या हितापुढे राजाला दुःखाची जाणीव नव्हती. सुमतीराणीच्या दिवसेंदिवस ढासळत जाणाऱ्या प्रकृतीकडे पाहून मात्र राजाची झोप उडाली. तो बेचैन झाला. त्याची आनंदी वृत्ती पालटली. चेहऱ्यावर उदासीनता, चिंता दिसू लागली.

राजाराणीच्या ह्या अवस्थेकडे पाहून प्रधानजीही अस्वस्थ झाले. राणीला बरे करण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा चालविली. साऱ्या देशात आणि देशाबाहेर दवंडी देण्यास सांगितले. जो कोणी राणीला बोलते करेल आणि तिला बरे करेल त्याला मागेल ते बक्षीस देण्यात येईल; असे जाहीर करण्यात आले. राजवाड्यापुढे हकीम - वैद्य, बैरागी - संन्यासी, तांत्रिक - मांत्रिक यांची रीघ लागली. जो-तो आपापल्या परीने प्रयत्न करू लागला.

एके दिवशी राजवाड्याच्या दारावर एक गोसावी आला. पहारेकरी त्याला हुसकावून लावत होते. राजाने हे पाहिले आणि त्याला आत

बोलवायला सांगितले. गोसावी आत आला. राजाने त्याला आसनावर बसवून पाद्यपूजा केली. गोसाव्याने राजाचे कुशल विचारले. राजा म्हणाला, "स्वामीजी, सर्व काही ठीक आहे. पण. . ." "माहिती आहे राजा, तुझे दुःख ! राणी बोलत नाही. दिवसेंदिवस तिची प्रकृती ढासळते आहे. त्याचीच तुला चिंता आहे ना ?"

"होय, स्वामीजी !"

"राजा, तिचे दुःखच असे तीव्र आहे की, त्यामुळे ती मूक बनली. तिने अंथरूण धरले !"

"स्वामीजी, याला काही उपाय नाही का हो ?" राजाने काकुळतीला येऊन विचारले.

"राजा, अशी घाई करू नकोस. सारे काही ठीक होईल. अगोदर राणी कोठे आहे ते तरी पाहू दे !"

"चला, स्वामीजी !" राजा चटकन उठला. राणीच्या महालात दोघेही आले. निरनिराळ्या देशांचे वैद्य, हकीम, मांत्रिक - तांत्रिक यांनी व्हरांडा फुलून गेला होता. प्रधानजी जातीने उभे होते. साऱ्यांचेच चेहरे चिंताग्रस्त दिसत होते.

महाराज येताहेत हे पाहून प्रधानजी धावत पुढे आले. सेवकांची धावपळ सुरू झाली. स्वामी राजाच्या मागोमाग शांत मुद्रेने पावले टाकीत होते. महाराज महालाच्या दाराशी येताच दासदासींनी अभिवादन करून महालाचे दार उघडले.

"प्रधानजी, राणीसाहेबांची तब्येत कशी काय आहे ?" राजाने महालात प्रवेश करण्याअगोदर प्रधानजीस प्रश्न केला.

"उपचार चालू आहेत, महाराज, पण राणीसाहेबांच्या तोंडून शब्द नाही अद्याप, प्रकृतीतही सुधारणा नाही फारशी !" प्रधानजी चिंतेच्या सुरात राजास म्हणाले.

BVBK-0402969

स्वामींजीना घेऊन राजा आत आला. दिवाणखान्याच्या मध्यभागी शय्येवर राणी झोपली होती. भोवताली दासी वारा घालीत होत्या, पाय चेपीत होत्या. एक वैद्यराज आपल्या शिष्यासमवेत राणीला औषध घालीत होते. राजा येताच सारी मंडळी शय्येपासून दूर झाली. राजाने आपला उजवा हात राणीच्या कपाळावर ठेवला. राणीने डोळे उघडून क्षीण नजरेने राजाकडे पाहिले. राणीची ही दुबळी अवस्था पाहून राजाला कसेसेच झाले. स्वामीजी पुढे झाले. त्यांनी आपल्या तेजस्वी नजरेने राणीकडे पाहायला सुरुवात केली. राणीची नजरही त्यांच्यावर खिळून राहिली. नंतर राजाकडे वळून स्वामीजी म्हणाले, "राजा, क्षणभर ह्या सगळ्या लोकांनी दिवाणखान्याबाहेर जायला हवं !" राजाने प्रधानजींच्याकडे पाहिलं. प्रधानजींनी नजरेनेच सर्वांना बाहेर जायला सांगितले. राजाच्या इशारतीबरोबर प्रधानजीही महालाबाहेर गेले. महालात राणी, राजा व स्वामीजी असे तिघेजण उरले. सर्वजण बाहेर गेल्याचे पाहून स्वामीजी उद्गारले, "राजा, सुमतीराणीला कोणताही आजार नाही. केवळ मानसिक व्यथेने तिची ही अवस्था झाली !"

"स्वामीजी, ह्याला काही औषध, उपाय नाही ?" राजाने हात जोडीत विचारले.

"राजा, व्यथेला औषध नसते ! पण राजा, तुझी प्रजाभक्ती पाहून मी प्रसन्न झालो आहे. राणीला मी प्रसाद देईन. त्याने ती झपाट्याने सुधारेल व सर्व काही ठीक होईल !" राणीकडे पाहत स्वामीजी उद्गारले, "मुली, तुझी चिंता मी जाणतो ! मी तुला प्रसाद देतो. त्यातला अर्धा भाग तू खा आणि अर्धा राजाला दे !" बोलत बोलत स्वामीजींनी आपल्या भगव्या झोळीतून एक तेजस्वी सफरचंद काढले.

"हे बघ, हा दिव्य प्रसाद ! ह्या तेजस्वी फलाप्रमाणे तुझ्या पोटीही तेजस्वी पुत्र होईल !"



"खरंच स्वामी. . . मला मुलगा होईल?" अत्यानंदाने राणी शय्येवरून उठत उद्‌गारली.

आणि राणी बोलली... ती उठून बसली हे पाहून राजा चकित झाला. त्याला अस्मान ठेंगणे झाले.

स्वामीजींनी ते दिव्य सफरचंद राणीच्या हाती ठेवून तिच्या मस्तकावर उजवा हात ठेवीत आशीर्वाद दिला, "पुत्रवान् भव !"

राणीच्या क्षीण डोळ्यांतून घळाघळा आनंदाश्रू वाहू लागले. राणी शय्येवरून उठायचा प्रयत्न करू लागली. अशक्तपणामुळे तिचा तोल जात होता. राजा तिला सावरण्यासाठी पुढे झाला. स्वामीजींनी राजाला हात करीत म्हटले, "राजा, तिला आधाराची जरुरी नाही !"

आणि खरोखरीच आधार न घेता राणी शय्येवरून उठली. खाली उतरून तिने स्वामीजींना नमस्कार केला. स्वामीजींनी पुनश्च "पुत्रवान् भव !" असा आशीर्वाद दिला. ते म्हणाले, "मुली, माझ्यादेखत तुम्ही दोघांनी हा प्रसाद भक्षण करा पाहू !"

राणीने त्या दिव्य सफरचंदाकडे पाहिले, त्याबरोबर त्याचे आपोआप दोन भाग झाले. एक भाग राजास दिला. राजाने नमस्कार करून तो प्रसाद आपल्या हातात घेतला. स्वामीजींच्या समोर बसून दोघांनीही प्रसाद भक्षण केला. प्रसादाचा अंश अंश पोटात उतरत होता तसतशी राणीची प्रकृती पालटत जात होती. हातातील संपूर्ण प्रसाद पोटात गेला, त्या वेळी राणीची प्रकृती ठणठणीत बरी झाली. राणी आजारी होती असे कोणीही म्हणणार नाही.

दोघांचाही प्रसाद भक्षण करून झाल्यावर स्वामींनी हास्ययुक्त मुद्रेने दोघांकडे पाहत म्हटले, "राजा, माझे कार्य झाले. निघतो मी आता ! पण एक लक्षात ठेव, मुलगा होईल. पुत्रप्राप्तीच्या आनंदात प्रजेला विसरू नकोस. प्रजेचाही पुत्रवत् सांभाळ कर. कारण त्या पुण्याईचेच आजचे हे

फल आहे !" स्वामीजी महालाच्या दरवाज्याशी आले. दरवाजा उघडला तसे प्रधानजी, दासदासी आत आल्या. राणी खडखडीत बरी होऊन आनंदी चेहऱ्याने राजासमोर उभी आहे, हे पाहून साऱ्यांच्याच आश्चर्याला सीमा राहिली नाही.

"महाराज, स्वामींनी बक्षीस काय मागितले ?" प्रधानजींनी आठवण करून देत राजाला प्रश्न केला.

"जा प्रधानजी, स्वामीजी अजून महालाच्या आवारात असतील. त्यांना बोलवा. त्यांना काय हवे ते विचारून घ्या !" राजा स्वतः गडबडीने दरवाज्यापर्यंत गेला देखील.

प्रधानजी, सेवक स्वामींना बोलावण्यासाठी गेले, पण स्वामीजी कुठेच दिसले नाहीत. ते महालाच्या दरवाजाशी उभ्या असलेल्या लोकांनादेखील बाहेर पडताना दिसले नव्हते. खूप शोधाशोध झाली, पण व्यर्थ !

राजाने सर्व हकीगत प्रधानजींच्या कानावर घातली तेव्हा प्रधानजी उद्गारले,

"महाराज, प्रत्यक्ष परमेश्वर संन्याशाचे रूप घेऊन आपणास प्रसाद देण्यासाठी आला होता. आपले काम करून तो अदृश्य झाला !"

"हेच खरे, प्रधानजी ! जाताना सांगून गेला की, पुत्रप्राप्तीच्या आनंदात प्रजेला विसरू नकोस. प्रजेचाही असाच पुत्रवत सांभाळ कर ! प्रधानजी, स्वामींचे हे शब्द आपण विसरता कामा नये !"

■

# संदीपकाची गुरुसेवा

गोदावरी नदीच्या तीरावर आंगिरस ऋषींचा आश्रम होता. त्या आश्रमाच्या आसपास बरेच ऋषिमुनी वेदविद्यांचा अभ्यास करीत असत. या मुनिजनातच वेदधर्म ऋषी राहत असे. वेदधर्माकडे बरेच शिष्य अभ्यासासाठी राहिले होते. सर्वजण त्यांची सेवा करीत आणि विद्याध्ययन करीत. ह्या शिष्यगणात संदीपक या नावाचा एक शिष्य होता.

एके दिवशी वेदधर्माने सर्व शिष्यांना जवळ बोलावून सांगितले की, "शिष्यहो, मागील जन्मी माझ्याकडून असंख्य पापे घडली आहेत. ईश्वरभक्तीमुळे ह्या जन्मी त्यांतील बरीचशी कमी झाली. तथापि अद्यापि काही पापे शिल्लक असून त्याचे परिणाम भोगावे लागणार. ह्या पापापासून सुटका व्हावी ह्यासाठी जी काही शिक्षा आहे ती मी भोगणार आहे. तुमचा हा गुरू आंधळा, पांगळा, कुष्ठरोगी अशा अवस्थेत खितपत पडेल, अशा वेळी तुमच्यापैकी कोणी शिष्य माझी सेवा करू शकेल का ?"

वेदधर्माच्या ह्या बोलण्यावर सगळे शिष्य स्वतःशी चुळबुळ करीत राहिले. एकवीस वर्षे आंधळ्या-पांगळ्या कुष्ठरोग्याची सेवा करणे म्हणजे एक दिव्यच होते. संदीपक सगळ्या शिष्यांच्या मागे उभा होता. क्षणाचाही विचार न करता त्याने गुरुजींना विचारले,

"गुरुजी, तुमचे पाप मीच भोगले तर ? तुमच्यासाठी मी अंध-अपंग, कुष्ठी होईन !"

गुरुजींना आश्चर्य वाटले. संदीपकाचे गुरुप्रेम पाहून ते मनोमन आनंदले. ते म्हणाले, "पापाचे फळ हे ज्याचे त्यालाच मिळत असते. ते मीच भोगायला हवे. त्याशिवाय सुटका नाही. तू एक कर– मला काशीला घेऊन चल. गंगामाईच्या पवित्र परिसरात माझे भोग भोगून मी पापमुक्त होईन."

गुरुजींच्या आज्ञेनुसार संदीपक आपल्या गुरुजींना घेऊन काशीस आला. तेथे आल्यावर स्नान-पूजा करताच गुरुजींच्या प्रारब्ध भोगाला सुरुवात झाली. त्यांचे सर्वांग कुष्ठरोगाने भरले. डोळे गेले. हातपाय लुळे पडले. रक्त-पू यांमुळे अंगाला दुर्गंधी यायला लागली. त्यांची ही किळसवाणी अवस्था होऊनही संदीपक मनोभावे सेवा करीत होता. रोज सकाळ-संध्याकाळ भिक्षा मागून आपल्या गुरुजींना घास भरविण्याचे काम तो करी. आजारी माणूस चिडखोर बनतो. कोणतीही गोष्ट त्याच्या मनास येत नाही. गुरुजींचा स्वभाव असाच चिडखोर झाला होता. संदीपक भिक्षा घेऊन आला की ते भिरकावून देत म्हणत,

"तू थोडेसेच अन्न आणलेस. मला एवढे पुरत नाही !" संदीपक जास्ती भिक्षा घेऊन आला तर म्हणत, "तू पक्वान्ने का आणली नाहीस ?" ते भयंकर रागवायचे. मारायला धावायचे. संदीपक मात्र शांत चित्ताने पुन्हा भिक्षेला जाई. भिक्षा घेऊन येई. गुरुजींना जेवू घाली.

कधी कधी गुरुजी शांत असत. त्या वेळी ते संदीपकाला म्हणत, "बाळ, केवळ माझ्यापायी तुला किती कष्ट पडतात रे !"

असे म्हणत असतानाच कधी कधी त्यांचा राग अनावर होई. "संदीपका, तू माझी सेवा नीटपणे करीत नाहीस. मी असल्या घाणीत, नरकात लोळतो, पण मला स्वच्छ करीत नाहीस !" असे म्हणून ते



त्याच्यावर ओरडत.

गुरुजींचा क्रोध संदीपक शांत मनाने पचवीत असे. गुरू म्हणजे साक्षात ईश्वर असे मानून, तो त्यांचे गुणदोष विसरून मनोभावे सेवा करीत असे.

काशीक्षेत्रासारख्या पवित्र ठिकाणी असूनही संदीपक गुरुजींना सोडून देवदर्शनाला कधी गेला नाही. ऊन, वारा, पाऊस ह्याची कधी पर्वा केली नाही. फक्त गुरुजी... त्यांची सेवा एवढेच तो जाणून होता.

संदीपकाची ही गुरुसेवा पाहून शंकर त्याला प्रसन्न झाले. ते त्याला म्हणाले, "संदीपका, तुझी गुरुभक्ती पाहून मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तुला हवा तो वर माग !"

संदीपक म्हणाला, "देवा, गुरुजींना विचारल्याशिवाय मी काही सांगत नाही."

तो गुरुजींच्याकडे आला. त्याने शंकराचे म्हणणे गुरुजींना सांगितले. गुरुजी त्याला म्हणाले, "भोग कुणाला सुटत नाहीत. तू वर मागशील आणि हे भोग माझ्या मोक्षाच्या मार्गात अडथळा आणतील !"

संदीपक शंकराजवळ आला. आपणाला काहीही वर नको, असे त्याने सांगितले. शंकराला आश्चर्य वाटले. वर न देताच तो माघारी गेला.

गुरुभक्तीची ही हकीगत शंकराने सर्व देवांना सांगितली. हजारो वर्षे तप करून आम्ही प्रसन्न व्हावे... वर द्यावा म्हणून ऋषिमुनींची धडपड चाललेली असते. असे असताना आम्ही होऊन प्रसन्न झालो, तर हा संदीपक मला काही नको म्हणतो ! आजपर्यंत असा शिष्य आणि असा गुरू आम्ही पाहिला नाही !

शंकराचे हे बोलणे ऐकून विष्णूही चकित झाला. आपले सर्वस्व गुरुसेवेला वाहणारा संदीपक आहे तरी कसा ते पाहू म्हणून, ते स्वतः त्याच्याजवळ आले. त्याला जवळ बोलावीत म्हणाले,

"बाळ संदीपका, तुझी ही गुरुभक्ती पाहून मी संतुष्ट झालो आहे. काय हवे ते माग !"

"देवा, मी तर तुझी भक्ती केली नाही. तुझे नाव घ्यायला वेळही मिळत नाही. असे असताना मला वर कशासाठी देतोस ?"

"संदीपका, तू एकाग्र चित्ताने केलेली गुरुभक्ती पाहून मी संतुष्ट झालो आहे. मात्यापित्याची सेवा, गुरूची सेवा म्हणजे माझीच सेवा आहे. गुरूची तू जी सेवा करतोस ती मला पोहोचते !" श्रीविष्णूचे हे बोलणे ऐकून संदीपकाला फार आनंद झाला. त्याने विष्णूला साष्टांग नमस्कार केला. विष्णूंनी त्याला पोटाशी धरीत म्हटले,

"काहीतरी वर माग !"

"देवा, वर द्यायचाच असेल तर माझी गुरुभक्ती आणखीन वाढावी एवढाच वर दे ! आणखीन काही नको मला !"

विष्णूने 'तथास्तु' म्हणून वर दिला आणि सांगितले, "संदीपका, माता, पिता, गुरू यांतील प्रत्येक शब्द दोन दोन अक्षरांचेच. पण या तिन्हींचे महत्त्व सागराहून अपार आहे. माता आपणाला जन्म देते, पिता आपला सांभाळ करतो आणि गुरू उज्ज्वल आयुष्याचा मार्ग दर्शवीत असतो. एका अर्थाने गुरू म्हणजे साक्षात ईश्वर असतो. ईश्वर आपल्यावर रागावला तर गुरू आपले रक्षण करील, पण, गुरू रागावला तर साक्षात देव आले तरी त्यांचा काही उपयोग नाही. म्हणून गुरूला देवाधिदेव म्हटले जाते. गुरू-शिष्य नाते कसे असावे ह्याचा आदर्श तुझ्यात आणि तुझ्या गुरूंत दिसून आला. गुरू ह्या दोन अक्षरांत अमृताचा समुद्र भरला आहे. तुझी गुरुसेवा म्हणजे माझीच सेवा आहे. म्हणून गुरूला सदैव प्रसन्न ठेवीत जा !"

श्रीविष्णूंनी आपल्याला वर दिला हे संदीपकाने गुरुजींजवळ सांगितले. गुरुजींनी विचारले, "बाळ संदीपका, कोणता वर दिला तुला

ईश्वराने ?"

"गुरुजी, तुमची सेवा अधिक चांगल्या प्रकारे हातून व्हावी हा वर मी मागितला !" संदीपक लीनतेने म्हणाला. त्याचे हे बोलणे ऐकून गुरुजींना अत्यंत आनंद झाला. शिष्याची कठोर परीक्षा पाहण्यासाठी ते कुष्ठमय झाले होते. शिष्य आपल्या परीक्षेत उतरला हे पाहून त्यांनी पुन्हा दिव्य देह धारण केला. संदीपकाला जवळ बोलावून आशीर्वाद देत ते म्हणाले,

"संदीपका, तू जे जे बोलशील ते ते खरे होत जाईल !"

गुरूकडून इच्छाशक्तीचा वर घेतलेल्या संदीपकाचे नाव अजरामर होऊन गेले.

■

२९६९

# शिष्यपरीक्षा

फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. द्वारावती तीर्थाजवळ धौम्य नावाच्या ऋषींचा आश्रम होता. आश्रमात शिक्षण घेण्यासाठी खूप दूरहून विद्यार्थी येत असत. आपल्या शिष्यांना वेदविद्या शिकवायची. त्यांच्याकडून वेगवेगळ्या प्रकारची कामे करून घ्यायची. विद्या आणि व्यवहार यात आपल्या शिष्यांना पारंगत करायचे आणि मग आशीर्वाद देऊन त्यांना आपापल्या घरी पाठवायचे. स्वतः शुचिर्भूत राहून शिष्यांना घडवायचे हे काम धौम्यमुनी अनेक वर्षांपासून करीत आले होते.

गुरुजी सांगतील ती कामे करून शिष्य वेदविद्येत पारंगत होत असत. धौम्यमुनींच्याकडे जे काही शिष्य होते त्यांत अरुणी नावाचा एक शिष्य होता. वेदविद्येत त्याने बरेच प्रावीण्य मिळवले होते. तथापि गुरुजींचे पढत विद्येवर समाधान होत नसे. आपला शिष्य व्यवहारातही तसाच आघाडीवर राहावा ही त्यांची मनोमन इच्छा असायची. म्हणून शिष्याला नकळत ते त्याची परीक्षा घ्यायचे.

परीक्षा अशी की, शिष्य केवळ विद्यापारंगत होतो का व्यावहारिक ज्ञानातही तरबेज आहे हे ते पाहत. वडीलधाऱ्या माणसांचे ऐकणे, आज्ञाधारकपणे वागणे, संकटांना तोंड द्यायला शिकणे हे सगळे अवगत असायला हवे. यासाठी ते आपल्या शिष्यांना नेहमी वेगवेगळ्या प्रकारची

कामे सांगून त्यांच्याकडून ती करवून घेत. यातून शिष्याची सर्वांगीण तयारी होत असे. गुरुजी नकळत परीक्षा घेत आणि त्यात शिष्याने यश मिळविले की ते त्याला आशीर्वाद देऊन घरी जायला परवानगी देत. या परीक्षेत शिष्य अपयशी ठरला तर त्याला पुन्हा आश्रमात राहावे लागे. धौम्यऋषींनी अरुणीची अशीच परीक्षा घ्यायची ठरविले. त्याला जवळ बोलावून सांगितले,

"बाळ, अरुणी, आपल्या शेतातील पीक सुकत चाललेय, तेव्हा आज तू तिकडे जा. पाट काढून शेतास पाणी दे. सगळे शेत भिजले की मग तू निघून ये !" गुरुजींची आज्ञा होताच अरुणीने आनंदाने हो म्हटले. त्यांना नमस्कार केला आणि पिकाला पाणी देण्यासाठी तो निघून गेला,

शेताच्या जवळूनच मोठा ओढा वाहत होता. तेथे येऊन उभारल्यावर अरुणीला मोठा प्रश्न पडला. शेत असे वरच्या बाजूला. पाणी बरेच खालून वाहातेय. पाणी इतक्या वरपर्यंत चढवायचे कसे ? कितीतरी वेळ तो विचार करीत होता. विचार करता करता त्याला एक कल्पना सुचली. ओढ्याच्या पाण्यात दगड टाकून पाणी अडवायचे. पाणी अडविले की, आपोआप वर चढेल. मग पिकाला पाणी देणे सोपे होईल.

ही युक्ती सुचल्यावर अरुणी लगेच उठला. मोटमोठी दगडे ओढ्याच्या वाहत्या पाण्यात टाकायला सुरुवात केली. बरीच दगडे टाकल्यावर, पाणी किती वर वर आले असेल हे पाहण्यासाठी तो ओढ्याच्या काठाशी थांबला. पाहतो तो पाणी वर चढलेले नाहीच. पण आपण टाकतो ते दगड मात्र पाण्याबरोबर पुढे सरकत चालले आहेत. अरुणीला काय करावे सुचेना. पुन्हा तो विचार करीत बसला. वेळतरी विनाकारण वाया जात होता. शेत कोरडे ठणठणीत होते.

गुरुजींनी सांगितलेले काम आपल्या हातून होत नाही ह्या जाणिवेने अरुणी बेचैन झाला. समोर ओढ्याचे पाणी वेगाने धावत होते. दगड, गोटे

त्यातून वाहून जात होते. अरुणी काठाशी बसून होता. बऱ्याच वेळाने त्याच्या मनात विचार आला— दगडे वाहून जातात. दगडाऐवजी आपण त्या प्रवाहात आडवे पडून पाणी अडविले तर पिकांना थोडे फार तरी पाणी मिळू शकेल.

युक्ती सुचायचाच अवकाश, लगेच तो ओढ्याच्या वाहत्या पाण्याजवळ आला. बाजूच्या काळ्या खडकाला दोन्ही हातांनी गच्च पकडून ठेवले. पाणी अडविण्यासाठी स्वतः पाण्यात आडवा पडून राहिला.

प्रवाहाचे पाणी पूर्णपणे अडविता आले नाही. बाजूने ते जात होते. तरीपण बरेचसे पाणी अडविता आल्याने जमीन हळूहळू भिजत होती. सुकत चाललेले पीक तृप्त व्हायला लागले होते.

अरुणी कितीतरी वेळ पाण्यात पडून होता. सूर्य मावळला. अंधार पडू लागला. अंधारापाठोपाठ थंडी पडायला लागली. खूप वेळ पाण्यात पडून राहिल्याने अरुणीचे अंग गारठून गेले. पण हळूहळू करीत साऱ्या पिकाला भरपूर पाणी मिळाले होते.

रात्र झाली. अजून आपला शिष्य आला नाही ह्या विचाराने धौम्यमुनी बेचैन झाले. त्याच्या सोबतीला आपण कोणीच पाठविले नाही. छोट्या अरुणीला जंगली श्वापदांनी मारून तर टाकले नसेल ? शंका-कुशंकांनी त्यांचे मन भारले गेले. शेवटी आपण स्वतःच त्याचा शोध घ्यावा ह्या विचाराने ते आश्रमाबाहेर पडले.

बाहेर अंधार मी म्हणत होता. जंगलातील प्राणी चित्रविचित्र आवाज काढीत शिकारीच्या शोधात हिंडत होते. रातकिड्यांची किर्र किर्र मन दडपून टाकीत होती. धौम्यमुनी एकेक पाऊल टाकीत अरुणीच्या शोधात चालले होते. पाचपंचवीस पावले चालायचे, थांबून कानोसा घ्यायचा. "बाळ अरुणी, कुठे आहेस रे तू ?" अशी हाक द्यायची. कुठून प्रत्युत्तर येते का ते पाहायचे. नाही उत्तर आले तर निराश होऊन पुन्हा पुढे चालत राहायचे. असं करता करता ते थेट शेतापर्यंत आले.



एव्हाना पूर्वेला चंद्र उगवला होता. त्याचा फिक्कट प्रकाश सगळीकडे पडलेला. अंगाशी झोंबणाऱ्या सौम्य वाऱ्याने थंडी अधिकच जाणवत होती. जवळचा ओढा खळखळाट करीत वेगानं धावत होता.

धौम्यमुनींनी शेताच्या बांधावर उभं राहून पाहिलं. चांदण्याच्या सौम्य प्रकाशात शेत लखलखत होतं संपूर्ण शेत पाणी पिऊन तृप्त झाल्याचं पाहून ते अरुणीवर मनोमन संतुष्ट झाले. पण लगेच त्याच्या विषयीच्या चिंतेनं मन काळवंडून गेलं. कुठं गेला असेल हा पोर ? हा ओढा एवढा खालून वाहतोय. पण उभ्या पिकाला पाणी पाजवून आपल्या आज्ञेचं पालन करणारा अरुणी कुठाय ? काळजीच्या स्वरात त्यांनी उभारल्या ठिकाणाहून हाक दिली,

"अरुणी. . . बाळ, कुठे आहेस रे तू ?"

टवकारलेल्या कानांनी ते त्याच्या आवाजाची अपेक्षा करीत होते. तोच दुरून दबलेला आवाज आला,

"गुरुजी, मी इथं आहे !"

त्यांच्या जीवात जीव आला. आवाजामागोमाग तोही येईल या अपेक्षेनं ते आहे त्या जागी थांबले. बराच वेळ झाला पण तो आला नाही. पुन्हा काळवंडल्या मनानं त्यांनी हाक दिली-

"अरुणी, कुठं आहेस रे तू !"

"मी इथं ओढ्याच्या पाण्यात आहे, गुरुजी." पुन्हा दुरून दबलेला आवाज ऐकून धौम्यमुनींना वाटलं, हा पाण्यात अडकून तर बसला नसेल ! चंद्राच्या प्रकाशात, चिखलातून वाट काढीत, धडपडत ते आवाजाच्या रोखानं ओढ्याच्या प्रवाहाकडे चालले. थांबून थांबून ते "कुठं आहेस तू ?" म्हणून विचारीत होते. त्याचा मागोवा घेत घेत ते ओढ्याच्या प्रवाहाजवळ आले. पाहतात तो अरुणी पाणी अडविण्यासाठी प्रवाहात आडवा पडलेला आहे. त्याने पाणी अडविल्यामुळे एका कडेने पाणी हळूहळू पिकाच्या दिशेने चालले आहे.

पिकाला पाणी देण्यासाठी योजलेली युक्ती पाहून धौम्यमुनी अरुणीवर प्रसन्न झाले. आपल्या जीवाची भीती न बाळगता धाडसाने अरुणीने ओढ्यालाच अडविले हे बघून, त्यांना आपल्या शिष्याचे कौतुक वाटले.

"बाळ अरुणी, ऊठ आता ! शेत बघ कसं तृप्त झालंय पाणी पिऊन."

धौम्यमुनींची आज्ञा होताच अरुणी प्रवाहातून बाहेर आला. त्यांच्यापुढे येऊन नमस्कार करून काकडत तो उभा राहिला.

"धन्य आहे तुझी, अरुणी ! जीव धोक्यात घालून शेतीला पाणी दे, असं तुला सांगितलं नव्हतं मी."

"पण गुरुजी, पीक सुकत चाललंय. तुमच्या आज्ञेप्रमाणं आज जर पिकाला पाणी मिळालं नसतं तर पीक हाताला लागलं नसतं."

"पण बाळ, रात्री-अपरात्री प्रवाहाबरोबर वाहात गेला असतास तर ?"

"आपले आशीर्वाद पाठीशी असल्यावर अशी अशुभ घटना घडेलच कशी, गुरुजी."

गुरुजींवरील निष्ठा, कार्यतत्परता आणि कार्यपूर्तीसाठी जीव धोक्यात घालून एकाग्रचित्ताने कष्ट घ्यायची तयारी हे सर्व पाहून धौम्यमुनी अरुणीवर संतुष्ट झाले.

दुसरे दिवशी सकाळी सर्व शिष्य नमस्कारासाठी आले. अरुणीनेही नमस्कार केला. त्याला जवळ घेऊन पाठीवरून हात फिरवीत ते म्हणाले,

"अरुणी बाळ, काल तुझी परीक्षा घेतली. त्या परीक्षेत तू चांगल्या रीतीने उत्तीर्ण झालास. वेदविद्येतही चांगलं प्रावीण्य मिळविलं आहेस. व्यवहारात ज्या अडीअडचणी येतील त्याला सामोरं जाऊन त्याचं चांगल्या रीतीनं निवारण करशील हे निश्चित. म्हणूनच आज आश्रमातून घरी जायला हरकत नाही."

अरुणीने आश्रमाचा निरोप घेतला. धौम्यमुनींच्या आशीर्वादांनी त्याचा आयुष्यमार्ग झगमगून गेला होता.

■

# परीक्षा

चंद्र पश्चिमेच्या बाजूस कलू लागला. सूर्यानं कदाचित त्याची हकालपट्टी करायचं ठरविलं असावं. पण तरीही तो आपला शीतल, सुखकारक नि शुभ्र प्रकाश पृथ्वीवर पसरवीत होता. त्या आनंदात रातराणी, मेंदी आणि इतर सर्व फुले फुलवून त्यांचा सुगंध सर्वांना वाटण्याचं काम वायू अगदी उत्तम रीतीनं करीत होता.

धवलमुनी आश्रमाबाहेरील स्वच्छ नि प्रशस्त जागेत झोपले होते. सभोवतीची झाडं फुलांनी भरून गेली होती. चांदण्याच्या शुभ्र प्रकाशातही विविध रंगी ही फुलं सृष्टीला आणखीनच खुलवीत होती. आश्रमाचा परिसर सुगंधानं अगदी दरवळून गेला होता.

धवलमुनींचा शिष्यगण बराच मोठा होता. सर्व थरांतील छात्रगण त्यांची सेवा करून विद्या शिकत होते. कोणी सर्पण आणीतं असे. कोणी शेती पिकवीत असे. कोणी फळे, कंदमुळे आणून देई. पण प्रत्येक विद्यार्थी आपापल्या परीने गुरुजींची मनोभावे सेवा करून विद्याभ्यास करीत होता.

नेहमीप्रमाणे भल्या पहाटेच्या वेळी मुनी जागे झाले. पडल्या पडल्याच आजच्या दिनचर्येची आखणी केली. कार्यक्रम नेहमीचाच होता. पण शिकून-सवरून आणि गृहस्थाश्रमाला योग्य झालेल्या अश्विनीची आणि माधवाची त्यांना नकळत आज परीक्षा घ्यायची होती. परीक्षेत पास

झाले तर त्यांना घरी जायला परवानगी मिळणार होती. दोघांनीही आजपर्यंत त्यांची मनोभावे सेवा केली होती. दोघेही गुरुजींचे आवडते शिष्य होते. हुशारही होते.

हळूहळू आश्रम जागा होऊ लागला. थोड्याच वेळात तेथील प्रत्येक व्यक्ती आपापल्या कामात गुंग होऊन गेली. धवलमुनींचा सकाळचा स्नान-संध्या व पूजेचा कार्यक्रम आटोपला. पाठांतर वर्गाची वेळ होत आली. एकेक शिष्य गुरुजींच्या समोर जमू लागला. पाच-दहा मिनिटांत ती जागा छात्रगणांनी भरून गेली. गुरुजी म्हणाले,

"अश्विनी, आज तुझ्यापासून सुरुवात करायची म्हणायला."

गुरुजींच्या तोंडून शब्द यायचा अवकाश, अश्विनीने 'बरं' म्हणून झालेले सर्व विषय घडाघडा पाठ म्हणून दाखवायला सुरुवात केली.

माधवाचीही गुरुजींनी अशीच नकळत परीक्षा घेतली. दोघेही ह्या परीक्षेत उत्तम रीतीने उत्तीर्ण झाले.

भोजन झाले. गुरुजींनी अश्विनीला हाक मारली, "अश्विनी, आश्रमातील सर्पण संपले आहे. आज सर्पण आणायची पाळी तुझी आहे."

आज्ञेचाच अवकाश होता. अश्विनीने हातात कुऱ्हाड घेतली. आणि वठलेली, वाळलेली झाडे बघत तो जंगलात निघाला.

आश्रमापासून तो बराच दूर आला. एक वाळलेली झाडाची फांदी त्याने पाहिली. झाडावर चढून ती फांदी तोडायला सुरुवात केली. वातावरण कसं शांत होतं. आणि एकाएकी कुठूनतरी टपटप आवाज येऊ लागला. आवाज हळूहळू वाढत होता. अश्विनीचं लक्ष तिकडं वेधलं गेलं. क्षणभर तो कान देऊन ऐकू लागला. 'होय, घोड्याच्या टापांचाच आवाज हा !' तो मनाशीच उद्‌गारला, 'अशा निर्जन घनदाट जंगलात कुणी येईल हे मनातसुद्धा येणार नाही.'

घोडा जसजसा जवळ येऊ लागला तसतसं त्याच्या आश्चर्यात भर



पडत होती. एक अत्यंत सुंदर युवती त्याच्या दिशेनं उमद्या आणि सुंदर घोड्यावर बसून येत होती. तिचे डोळे पाणीदार होते. केस लांबसडक व काळेभोर होते. चेहरा आरक्त व हसरा होता. तिच्या नाजूक हाताला शोभेल असा सुंदरसा लगाम हाती होता. अशा स्थितीतील सुंदर वस्त्रे परिधान केलेली ती तरुणी आणि एकांत, निर्जन ठिकाणी आपल्याकडे येत आहे. सर्व काही अगदी मोहिनी पाडण्यासारखं होतं. अश्विनी तिच्या त्या कोमल आवाजाने भानावर आला. ती युवती त्याला विचारीत होती,

"मुनीजींचा आश्रम कुठे आहे ?"

'परस्त्रीशी कसे वागावे' ह्या गुरुजींच्या उपदेशाने तो सावध झाला. युवतीविषयी आदरभाव निर्माण झाला.

"गुरुजींचा आश्रम? चला, दाखवितो तुम्हाला !" तो आदरयुक्त शब्दात उद्गारला.

दोघे चालू लागले. लांबून आश्रम दिसू लागताच ती युवती त्याला म्हणाली, "जाईन मी एकटी आता. तुमच्या कामात व्यत्यय आणला विनाकारण !"

"व्यत्यय कसला ! माहिती नसेल तर नको का दाखवायला !"

युवती आश्रमाच्या दिशेने जाऊ लागली. अश्विनी पुन्हा जंगलाच्या दिशेनं वळला. सर्पण तोडून टाकलं होतं, त्या ठिकाणी तो आला. तोडलेल्या सर्पणाचा भारा बांधला. भारा डोक्यावर घेऊन तो आश्रमाकडे आला.

नेहमीपेक्षा आश्रमात परतायला त्याला थोडा उशीर झाला होता. गुरुजींनी नेमका हाच प्रश्न केला,

"अश्विनीबाळ, आज उशीर झाला तुला यायला ? काही विघ्न आलं का कामात ?"

झालेली गोष्ट अश्विनीने गुरुजींना सांगितली. शेवटी प्रश्न केला,

"आश्रमात नाही आली कोणी युवती ?"

"कोणी आलं नाही !" मान डोलवीत गुरुजी उद्‌गारले. पुढील कामे करायची होती म्हणून गुरुजी उठले. अश्विनीही उठला.

दुसरे दिवशी गुरुजींनी माधवाला सर्पण आणण्यासाठी जंगलात पाठविलं. खांद्यावर कुऱ्हाड टाकून वठलेले झाड शोधीत माधव बराच दूर आला. आंब्याच्या झाडाची एक फांदी वाळलेली होती. माधव झाडावर चढला. कुऱ्हाडीने फांदी तोडायला सुरुवात केली. खाली सर्पण पडत होते. माधव छोट्या छोट्या फांद्या तोडून खाली टाकीत होता.

पुरेसे सर्पण तोडून झाल्यावर तो खाली उतरला. सर्पण गोळा करून मोळी बांधायला सुरुवात केली, तोच घोड्याच्या टापांचा आवाज कानावर आला.

'ह्या निर्जन अरण्यात रखरखीत दुपारी कोण बरं आलं असावं ?' विचार करीत त्याने मान वर करून पाहिलं आणि काय आश्चर्य ! एक सुंदर तरुणी पांढऱ्याशुभ्र घोड्यावर बसून येत आहे.

माधवाला त्या सुंदरीची मोहिनी पडली. जवळ येऊन घोड्यावरूनच तिने विचारले, "धवलमुनींचा आश्रम कुठे आहे ?"

माधव तिच्या बोलण्याचीच वाट बघत होता. तिच्यावर मोहित होत त्याने उत्तर दिलं,

"सुंदरी, आश्रम फार लांब आहे. चालत येऊन दाखवायचं म्हणजे अंधार होईल. तेव्हा दोघंही ह्या घोड्यावरून जाऊ या."

तिनेही मान हलवून होकार दिला. दोघंही घोड्यावर बसली. लांबच्या फेरानं माधवनं घोडा घेतला. तिच्या स्पर्शाने तो मोहरून जात होता. सूर्य मावळण्याच्या सुमाराला तो आणि सुंदरी आश्रमाजवळ आले. आश्रम दिसू लागताच तो घोड्यावरून खाली उतरला आणि घोड्याचा लगाम हाती घेऊन चालू लागला. थोडं पुढं चालून आल्यावर तो त्या सुंदरीला म्हणाला,

"हाच तो आश्रम." मागून प्रत्युत्तर आले नाही तेव्हा त्याने वळून पाहिले, तो काय आश्चर्य, ती सुंदरी, तो घोडा सारे अदृश्य झाले होते. माधव गडबडून गेला. त्याला आठवले, आपण लाकडे आणायला जंगलात गेलो होतो. सुंदरीला पाहून मोळी तिथेच टाकून आलो. आता गुरुजींना काय सांगायचं ? अंधारात पुन्हा जंगलात जाऊन मोळी आणणं शक्य नव्हतं.

विचार करीत तो आश्रमात आला. धवलमुनी त्याला बघताच सामोरे आले.

"माधवा, किती वेळ झाला रे तुला. काही संकट आलं का तुझ्यावर ?"

"नाही, गुरुजी."

"ठीक आहे, सर्पण वाळलेलं आणलंस ना ?"

माधव ह्या प्रश्नावर चपापला, पण लगेच स्वतःला सावरून घेत धूर्तपणाने म्हणाला, "हो गुरुजी, पाकशाळेत टाकलीय मोळी."

रात्री सर्व छात्रगण झोपायच्या तयारीत होते. धवलमुनींनी माधव आणि अश्विनी या दोघांनाही जवळ बोलावून घेतलं. अश्विनीच्या पाठीवरून हात फिरवीत ते म्हणाले, "बाळ अश्विनी, तू विद्यापारंगत झालास त्याचप्रमाणे व्यवहारपारंगतही झाला आहेस. आपली जबाबदारी तू उत्तम रीतीने पार पाडशील. दिलेलं काम कसं पार पाडावं, परस्त्रीशी कसं वर्तन ठेवावं, हे करीत असतानाच सत्य आणि सभ्यता यांच्या आचरणामुळे तू खऱ्या अर्थाने गृहस्थाश्रमाला पात्र ठरला आहेस. उद्या तुला हा आश्रम निरोप देणार आहे. तुझं गृहस्थाश्रमातील जीवन सुखमय होवो !"

त्यानंतर गुरुजींनी माधवाकडे पाहिलं. त्यांच्या चेहऱ्यावर थोडी नाराजी आली. त्याला जवळ बोलावून ते म्हणाले, "माधवा, तू

विद्यापारंगत झालास, पण व्यवहारात कोणत्या वेळी कसं वागावं हे ज्ञान तू अजून पचविलं नाहीस. परस्त्रीशी सभ्यतेनं वागता येत नाही तुला. स्त्री पाहिल्याबरोबर मोहिनी पडते. गुरुजनांनी सांगितलेल्या कामाचा विसर पडतो. त्यामुळे त्यांच्याशी खोटं बोलायची पाळी येते. माधवा, तुमच्या दोघांची परीक्षा घेण्यासाठी मायारूपाने सुंदर स्त्री निर्माण करून तुमच्याकडं जंगलात पाठविली होती. तिला आदराने वागवून, अश्विनी त्यात उत्तीर्ण झाला. तू मात्र गडबडलास. अश्विनीने तिच्याविषयी सारी माहिती मला सांगितली. तू सारी हकीगत लपवून ठेवलीस. सर्पण आणलं म्हणून खोटं सांगितलंस."

गुरुजी हे सारं सांगत होते तो अश्विनीचे डोळे भरून आले. गुरुजींच्या पायावर डोकं ठेवीत तो म्हणाला, "गुरुजी, माधवाला क्षमा करा." "बाळांनो, तुम्ही सारीजण माझी मुलंच आहात. चूक होणं स्वाभाविक आहे. तीच चूक पुन्हा होऊ देता कामा नये. माधवाला मी क्षमा केलीय. पण अजून काही दिवस त्याला आश्रमात राहायला हवं. मी शुद्ध आचरणानं वागतो आहे, असं त्याचं त्याला वाटायला लागलं की त्यालाही घरी जायला मिळेल."

माधवाचे डोळे ओले झाले. गुरुजींच्या पायावर डोके ठेवून त्याने त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानली.

चांगले गुण अंगी बाळगायचा त्याने निश्चय केला.

■

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
अ. क्र. २९६९ दिनांक ३/३/०८
विषय बो.क. रु.

# तीन भावंडे

विजयगिरी नावाचे एक नगर होते. ते खूप सुंदर नि मोठे होते. नगरापासून दूर, एका बाजूला एक लहानशी झोपडी होती. झोपडीबाहेर छोटेसे अंगण होते. अंगण स्वच्छ शेणाने सारवलेले होते. त्याच्या मधोमध इवलेसे, झुबकेदार तुळशीचे रोप लावलेले. तुळशीपुढे रांगोळी काढलेली असे.

ही झोपडी एका गरीब बाईची होती. नगरीतील सगळे लोक तिला गंगाआई या नावाने हाक मारीत. गंगाआई आता खूप थकली होती. तिचे केस पिकले होते. चालताना ती कमरेत वाकून चालायची. तिला अंधुक अंधुक दिसायचे. तरीपण ती सकाळी लवकर उठायची. घरातील कामे उरकायची. मुलांना खाऊ घालायची. मग नगरात जायची. तिथे तिला खूप कामे असत. लोकांचे कपडे धुवायचे, भांडी घासायची, कुणाची भाजी आणून द्यायची, दळणे आणायची; अशी दिवसभर ती मोलमजुरी करायची. संध्याकाळी मुलांना काही तरी खाऊ घेऊन ती घरी परतायची.

गंगाआईला तीन मुले होती. मोठा विलास, मधला विनय, धाकट्याचे नाव विजय. विलास मोठा असला तरी फार भांडखोर होता. तसेच तो फार आळशीही होता. काम करायचा नाही. आईला कधी मदत करायचा नाही. खायला-जेवायला मिळाले की तो चैनीत हिंडायचा.

विनय शांत आणि गरीब होता. पण एक नंबरचा लबाड होता. तो नेहमी खोटे बोलायचा. आई बाहेरून आली की, हळूच घरात येई, खोटे बोलून, लुबाडून खायला मिळवी. आईने काम सांगितले की, हळूच खेळायला पळून जाई.

धाकटा विजय दोघा भावांहून हुशार होता. पहाटे आईच्या पाठोपाठ तो उठे. आईला पाणी आणण्यास मदत करी. वाळलेली लाकडे वेचून सरपण आणून देई. आपली आई आपणासाठी खूप कष्ट करते. तिला मदत करावी, तिचे काम हलके करावे, असा तो विचार करी. आईला मदत करण्याच्या बाबतीत तो कधीही आळस करीत नसे.

विलास आईला उलट बोले. विनय खोटे बोले. तिचे ऐकत नसे. या दोघांचाही विजयला खूप राग येई. तरीपण हे दोघेही आपलेच भाऊ आहेत, आज नाही उद्या सुधारतील असे समजून तो शांत राही. आईची देखील तिघांवर सारखीच माया होती.

एकदा काय झाले, कामाच्या मदतीसाठी आपणालाही आईने नगरात घेऊन जावे म्हणून विजय हट्ट धरून बसला.

आईने त्याला पोटाशी धरून कुरवाळले.

"बाळ, तिथे खूप गर्दी असते. मोठमोठे रस्ते असतात. तू भांबावून जाशील. चुकशील. मोठा झालास की तुला नगरात रोजच जावे लागेल कामासाठी." आईने त्याला खूप समजावले, पण विजय काही केल्या ऐकेना. आईबरोबर जायचे म्हणून हट्ट धरून बसला. शेवटी नाइलाजाने आईने त्याला बरोबर घेतले.

विजय आईबरोबर नगरात निघाला हे बघताच, विलास आणि विनयही लपत छपत आईच्या पाठोपाठ नगरात आले. विजय आईचे बोट धरून नगरातील मजा बघत, आईला प्रश्न विचारीत चालला होता. ही वाण्याची दुकानं, ही दळणाची गिरणी, ही भाजी मंडई अशी सगळ्या

ठिकाणांची माहिती जाता जाता आई त्याला देत होती. तोही मोठ्या उत्सुकतेनं सारं लक्षात ठेवायचा प्रयत्न करीत होता.

इनामदारांचा वाडा आला. दार उघडून आई त्याला आत घेऊन आली. इनामदारांच्याकडे आई स्वयंपाक करायची. दळण दळून आणायची. इतर कामे करायला त्यांच्याकडे गडीमाणसे होतीच.

“गंगाआई, पोराला घेऊन आला वाटतं?” आत आल्याबरोबर विजयकडे बघून इनामदारांच्या काकूंनी विचारलं.

“येणार म्हणून हट्ट धरून बसला. म्हटलं, चल! विजय, काकूंना नमस्कार कर, बाळ.” त्याने वाकून नमस्कार केला.

“हुशार आहे हं पोर!” काकूंनी शेरा दिला.

“गंगाआई, दळण आणायचं आहे हं आज.”


“आणते हं, काकू,” गंगाआई दळण निवडायला बसली. विजयही तिच्या पुढ्यात बसला.

विलास आणि विनय आईमागून लपत छपत आले होते. बाहेर भिंतीआड दडून बसले होते.

गंगाआई दळण आणायला निघाली. विजयही तिच्या मागोमाग चालला. काकींनी विजयला हाक मारली-

“विजय, तू माझे एक काम कर. वाण्याच्या दुकानातून एक तोळा वेलदोडे घेऊन ये.” विजयकडे वेलदोड्यासाठी पैसे दिलेत हे विलासने आणि विनयने पाहिले. त्यांनी दुकानाकडे जात असताना वाटेत त्याला गाठले. त्याच्याकडील पैसे हिसकावून घेतले नि दोघांनीही मिठाईच्या दुकानाकडे धूम ठोकली. विजय बिचारा रडत बसला. काय करावे हे त्याला सुचेना.

नगराची पाहाणी करायला प्रधानजी रथातून बाहेर पडले होते. विजय रस्त्याच्या कडेला एकटाच रडत उभा असलेला पाहून त्यांनी रथ



थांबविला. विजयला जवळ बोलाविले आणि विचारले, "बाळ, का रडतोस तू ?"

त्याला आणखीन रडू आले. आपल्याच भावांनी पैसे हिसकावून नेले हे सांगायचं तरी कसं. खोटे बोलायची तर सवय नाही. भावांचं तरी रक्षण व्हायला पाहिजे. त्याने सांगितलं, "महाराज, माझ्या भावांना भूक लागली होती. काकूंनी माझ्याकडे बाजारासाठी पैसे दिले होते. ते त्यांनी हिसकावून घेतले. मिठाई खायला पळाले ते. पण महाराज, त्यांना शिक्षा करू नका, भूक लागली होती त्यांना खूप !" त्याने खरं सांगून टाकलं.

"एवढंच ना ? दिवाणजी, याला देऊन टाका पैसे !"

"नाही महाराज, काम केल्याशिवाय पैसे घ्यायचे नसतात. आईनं सांगितलं आहे तसं." विजय धिटाईने बोलला. प्रधानजींना त्याचं कौतुक वाटलं.

"अरे बाळ, इथं तुला काम कुठलं आणायचं ?"

"मग मला तुमच्या घरातलं काम सांगा."

"छान ! दिवाणजी, याला रथात घ्या. चलाख दिसतोय हा पोर."

विजय रथात बसून प्रधानजींच्या वाड्याकडे चालला. विलास आणि विनय वाटेत मिठाईच्यां दुकानात मिठाई खात उभे होते.

प्रधानजींचा वाडा खूपच मोठा होता. विजयने अद्याप एवढा मोठा वाडा पाहिलेला नव्हता. गडीमाणसं, दासदासी यांनी वाडा गजबजला होता. क्षणभर तो भांबावून गेला. प्रधानजींनी त्याला आत आणले.

"हा बघ आमचा वाडा." प्रधानजी म्हणाले.

"पण मला काम हवंय."

"आईनं काय काम शिकवलंय तुला ?" प्रधानजींनी विचारलं.

"खरं बोलावं, कुणाला लुबाडू नये, वडील माणसांना मान द्यावा, कष्ट करून जगावं आणि खूप खूप काही शिकवलंय !"

"वा छान ! विजय, आमची छोटी बेटी आहे. तिच्याबरोबर तू पुस्तक वाचायला शिकायचं, लिहायला शिकायचं. तूर्त हे काम तुझं. बरं, तुझी आई कुठे असते ?"

"आता ती इनामदारांच्याकडे आहे. आईही खूप काम करते. ती म्हातारी आहे. आम्हीही तिला मदत करतो."

प्रधानजींनी विचार केला— हा एवढासा मुलगा एवढा गुणी आहे. त्याच्यावर एवढे संस्कार करणारी आई आपल्या वाड्यात हवीच. नगरात चार जणांकडे कष्ट करण्यापेक्षा ती इथेच राहिली तर आपला फायदाही होईल. तिलाही खूप विश्रांती मिळेल.

प्रधानजींनी इनामदारांकडे शिपाई पाठवून दिला. आपल्याकडे शिपाई आलेला बघून गंगाआई घाबरलीच. वाण्याच्या दुकानात गेलेला विजय अजून परत आला नव्हता. ती विचार करते तोवर इनामदारांच्या काकू मागून बोलल्याच,

"गोड बोलला म्हणून पोराकडं पैसे दिले. त्यानेच कुठेतरी गुण उधळले असतील."

आपला मुलगा तसं करणार नाही, याची गंगाआईला खात्री होती. काकूंचे बोलणे ऐकून तिला फार वाईट वाटले. डोळ्यांत पाणी आणून ती शिपायाबरोबर वाड्यात जायला निघाली. विलास आणि विनय वाटेत दुकानाच्या पायरीवर बसले होते. सकाळी मिठाई खाल्ली, आता काय ? भुकेने पोटात कावळे ओरडत होते. काम करायचा तर आळस येत होता. आई दिसताच ते धावत तिच्यापाठोपाठ आले.

आई वाड्यात आली. प्रधानजी दिसताच रडत रडत त्यांच्या पायावर डोके ठेवण्यासाठी ती वाकली. तिला वाटले, पोराने काहीतरी गुन्हाच केलाय. प्रधानजींनी तिला आपल्या पाया पडू दिले नाही. उलट तेच म्हणाले, "गंगाआई, तुमच्याहून लहान ना मी !" एवढी जख्ख म्हातारी

अजून कष्ट करते नि प्रामाणिकपणे जगते, याचं त्यांना आश्चर्य वाटलं. गंगाआईचे डोळे अजून ओले होते.

"प्रधानजी, माझ्या मुलाला माफ करा हो."

"पण गंगाआई, त्यानं गुन्हा केलाच नाही. उलट तो म्हणतोय की काम द्या. काम केल्याशिवाय जेवणार नाही म्हणतोय. गंगाआई, असली मुलं आमच्या वाड्यात हवीत. त्यांना आम्ही शिकवू, मोठं करू. तुमचा विजय चांगला तयार झाला, तर पुढे आमच्यासारखा प्रधानजींही होईल ! तुम्हीसुद्धा आजपासून इथे वाड्यावरच राहा. जमेल तेवढं काम करा, खूप विश्रांती घ्या. चालेल ना ? तेवढ्यासाठीच तुम्हाला बोलावून घेतलं इथे !"

"कष्ट कुठेही करायचे. पोराच्या पुण्याईने आपल्या इथे सेवा करायला मिळतेय हे काही थोडं नाही !" गंगाआई नम्रपणाने उद्गारली.

गंगाआईच्या पाठोपाठ आलेले विलास आणि विनय यांनाही प्रामाणिकपणा, कष्टाळूपणा यांचे मोल कळून चुकले. विजयचे पैसे हिसकावून घेतल्याबद्दल त्यांना खूप पश्चात्ताप झाला. आपणही विजयसारखे वागायचे, कष्ट करायचे, खरे बोलायचे असे त्यांनी मनाशी ठरवून टाकले. गंगाआईच्या शिकवणुकीमुळे आणि विजयच्या वागणुकीमुळे ती तिन्ही भावंडे सुखी झाली.

# लक्ष्मी आणि सरस्वती

इंद्रसेन नगरात देवशर्मा नावाचा एक प्रसिद्ध वैद्य राहत असे. रोगाचे अचूक निदान आणि त्यावर रामबाण औषध यामुळे दूरदूरचे लोक उपचारासाठी त्याच्याकडे येत. एवढा नावलौकिक असला तरी देवशर्मा पैसे न कमावता सेवाभावाने औषध देत असे. एखादा गरीब, आजारी माणूस आला तर औषधाबरोबर पै-पैशाची मदतही करीत असे.

देवशर्माला अजय आणि संजय असे दोन मुलगे होते. दोघेही हुशार होते. अभ्यास झाला की आपापल्या परीने ते वडिलांना मदत करीत असत.

गरिबांचा वाली असा देवशर्मा आता वृद्ध झाला. औषध देताना हात थरथर कापू लागले. तरीपण लोकांची त्याच्याकडे गर्दी असायची. पुढे पुढे देवशर्माला उभे राहण्याचीही शक्ती राहिली नाही. डोकेही काम देईनासे झाले. अंथरुणावर पडून कोणाला काय औषध द्यायचे हे तो आपल्या मुलांना सांगे. त्यांच्याकडून कामे करून घेई. अजय वडिलांना मनापासून मदत करीत असे. संजय मात्र टाळाटाळ करी.

आयुष्यभर निःस्वार्थीपणे लोकांची सेवा केल्याचे फळ देवशर्माला द्यावे, असे जणू देवाला वाटले. एके दिवशी भल्या पहाटे अंथरुणावर बसून क्षीण आवाजात भूपाळी म्हणून देवशर्मा देवाला आळवीत होता. नेमके त्या वेळीच श्रीविष्णू त्याच्यासमोर उभे राहिले. विष्णूचे ते तेजस्वी

रूप पाहून देवशर्माला आपण स्वप्नात तर नाही ना असे वाटून गेले. बसल्या जागी वाकून त्याने देवाला नमस्कार केला. हसून देवाने त्याच्या मस्तकावर हात ठेवीत म्हटले,

"देवशर्मा, तुझी निःस्वार्थी लोकसेवा पाहून मला खूप आनंद झाला. तुला हवा तो वर माग."

देवशर्मा म्हणाला, "देवा, पिकलेल्या पानासारखी माझी अवस्था झालीय. या वृद्धावस्थेत तुझा वर घेऊन काय करू मी ! लोकांची सेवा करणं हे तर एक कर्तव्य होतं. त्यात काही विशेष केलंय असं मला वाटत नाही."

तरीपण देवाने वर माग म्हणून आग्रह केला. अखेर देवशर्मा म्हणाला, "देवा, मला काही नको ! द्यायचंच असेल तर माझ्या दोन्ही मुलांना काय पाहिजे ते दे."

देवशर्माने दोन्ही मुलांना जवळ बोलावले, आणि काय हवे असेल तो वर देवाकडून घ्यायला सांगितले.

संजयने क्षणाचाही विचार न करता, एक लक्ष सुवर्णमुद्रा देवाकडे मागितल्या. अजयने खूप विचार केला. हात जोडून तो म्हणाला, "देवा, मला मोठं व्हावं, माझा नि वडिलांचा नावलौकिक वाढावा, असं वाटतंय."

"तथास्तु ! तुमच्या दोघांच्याही इच्छा पूर्ण होतील." एवढे बोलून दोघांच्याही हातांत एक एक सुंदर पेटी देऊन देव अदृश्य झाला.

संजयने घाईघाईने हातातील पेटी उघडली. सुवर्णमुद्रांनी पेटी पूर्णपणे भरली होती. त्याला खूप आनंद झाला. आता काम न करता चैनीत राहता येईल या विचाराने तो खूष झाला.

देवाचा प्रसाद म्हणून आपल्याला पेटी मिळाली आहे, या विचाराने त्याची पूजा करून मगच अजयने ती पेटी उघडली. पेटी ग्रंथांनी भरलेली होती. अजयने वडिलांना सारे ग्रंथ दाखविले. देवशर्मा हर्षयुक्त शब्दात

म्हणाला, “बाबारे, वैद्यक शास्त्रावरील अमोल, दुर्मिळ ग्रंथ आहेत हे. यांचा नीट अभ्यास केलास तर तू निष्णात वैद्य होशील. मोठे मोठे लोक उपचारासाठी तुझ्याकडे येतील. पण गोरगरिबांची सेवा करायला विसरू नकोस.”

अजयने वडिलांच्या शब्दांची पुरेपूर आठवण ठेवली. देवाकडून मिळालेल्या दुर्मिळ ग्रंथांचा अभ्यास म्हणजे सरस्वतीचीच पूजा आहे असे मानून, लक्षपूर्वक एकेक ग्रंथाचा तो अभ्यास करू लागला. वडिलांच्या शब्दाला मान देऊन वैद्यक व्यवसायही त्याने चालू ठेवला.

माणसाच्या जन्माला येऊन चैन करायची या विचारांनी संजयने देवाकडून लक्ष्मीला प्रसन्न करून घेतले. लक्ष सुवर्ण मोहरांत वडील आणि भाऊ यांची वाटणी नको या विचाराने संजयने मोठी हवेली विकत घेतली. चांगल्या मुलीशी लग्न केले आणि तिच्यासह तो चैनीत राहू लागला.

अंथरुणावर पडून असलेल्या देवशर्माला संजयच्या या वागण्याचे दुःख झाले. मुलगे कर्ते झालेत तेव्हा, आपण अधिक न बोलणे बरे या विचाराने तो गप्प राहिला.

अजयने ग्रंथ वाचून, वडिलांचा वेळोवेळी सल्ला घेऊन वैद्यकशास्त्रात नावलौकिक कमवायला सुरुवात केली. त्याच्या औषधोपचाराने असाध्य, जुने रोगही बरे व्हायला लागले. त्यामुळे साहजिकच लोक म्हणत की, देवशर्मापेक्षा मुलाने नाव कमावले.

पुढे इंद्रसेन नगरावर शेजारच्या भीमसेन राजाने स्वारी केली. इंद्रसेन राजा चार दिवस हल्ले परतवून लावीत होता. चौथ्या दिवशी तुंबळ युद्ध होऊन त्यात इंद्रसेन राजा ठार झाला. भीमसेनच्या सैन्याने विजयोत्सवाच्या आनंदात नगरात धुमाकूळ माजविला. अनेकांची घरेदारे लुटली. धनिकांची दडवून ठेवलेली संपत्ती बाहेर काढायला लावली. सैन्याला घाबरून लोक न बोलता सोने-नाणे आणि संपत्ती त्याच्यापुढे

आणून ठेवीत असत. युद्ध थांबले तरी नगरात हाहाःकार चालू होता. जखमी झालेले सैन्यही विव्हळत, किंचाळत पडले होते. अजय पोट आणि झोप विसरून जखमी सैनिकांवर उपचार करण्यासाठी धावून गेला. रात्रंदिवस खपून दिसेल त्या आपल्या आणि शत्रूच्या सैनिकालाही मलमपट्टी करून योग्य ती औषधे देत होता. शत्रू कोण मित्र कोण याचे त्याला मुळीच भान नव्हते.

नगरातील वातावरण निवळले. तरीपण अजयपुढे कामाचा डोंगर होता. मान वर करायलाही सवड नव्हती.

शत्रूच्या जखमी सैन्यावर उपचार करण्यात अजय मग्न होता. छावणीला भेट देण्यासाठी भीमसेन राजा आला. बरोबर प्रधान, सेनापती इत्यादी मंडळी होती. राजा येत आहे याचे अजयला बिलकूल भान नव्हते. तो एका सैनिकाची जखम धुऊन मलमपट्टी करण्यात गुंग होता. राजाने प्रधानाजवळ चौकशी केली. त्याला एकाग्रतेने काम करणारा हा वैद्य कोण हे सांगता आले नाही. अखेर राजानेच त्याला जवळ बोलावून घेतले. कोण, कुठचा चौकशी केली. हा याच नगरातील आहे हे ऐकून राजा आश्चर्याने म्हणाला, "शत्रूच्या सैनिकांवर उपचार करताना कोणी काही बोललं नाही तुला ?"

"महाराज, जखमी झालेला सैनिक हा प्रथम माणूस असतो. तो शत्रुपक्षाकडील आहे का आपल्याकडील आहे याला अर्थ नाही. वैद्याने शत्रू-मित्र भेद बाळगायचा नाही, असं आमच्या गुरूने सांगितलंय !"

अजयच्या या बोलण्याने राजाला खूप आनंद झाला. त्याने विचारले,

"कोण गुरू तुझा ?"

"माझे वडीलच माझे गुरू. देवशर्मा त्यांचं नाव !"

देवशर्माचं नाव ऐकताच प्रधानाने पुढे होऊन विचारले, "त्यांचा मुलगा तू ?" मग राजाकडे वळत म्हणाला, "महाराज, गेल्या वर्षी



पोटदुखीनं आपण आजारी होता आणि सगळ्या वैद्यांची औषधे झाली तरी गुण येईना, तेव्हा खास घोडेस्वार पाठवून यांच्याकडूनच औषध आणविलं होतं. त्या औषधाने आपणाला लगेच गुण आला होता !"

प्रधानजीने एवढे सांगताच राजाने अजयच्या पाठीवरून हात फिरवीत म्हटले, "निष्णात वैद्य तर आहेसच, पण शत्रू-मित्र भेदभाव न बाळगता आणि पैशाचा मोह न बाळगता निःस्वार्थीपणे चाललेले तुझे कार्य बघून मला खूप आनंद झाला आहे. प्रधानजी, आजपासून राजवैद्य म्हणून आमच्या दरबारात मानाने घेऊन या याला !"

"पण महाराज, गरीब, गरजू लोकांची सेवा करण्याचीही परवानगी असावी मला !" अजय धीटपणाने म्हणाला.

"जरूर, जरूर ! तीच अपेक्षा आहे वैद्यराज, आपणाकडून ! त्यासाठी आम्ही कुठल्याही प्रकारे बंधन घालणार नाही तुमच्यावर !" राजाने आनंदाने मान्यता देत म्हटले.

अशा रीतीने अजयने लोकमान्यतेबरोबर राजमान्यताही मिळविली. इकडे सगळ्या धनिक-सावकारांची सैन्याकडून जी लूट झाली त्यात संजयची सारी संपत्ती लुटली गेली. हवेलीचीही बरीच मोडतोड झाली. चैनीत राहायची सवय झाल्याने त्याचे आणि त्याच्या बायकोचे अतोनात हाल व्हायला लागले. पैसा होता तेव्हा आपल्या घराची, वडिलांची, भावाची आठवण झाली नाही. आता एक वेळ पोट कसे भरायचे या चिंतेमुळे आणि उपासमार व्हायला लागल्याने त्याला घराची आठवण यायला लागली. अशा परिस्थितीत वडिलांना नि भावाला तोंड दाखवायची लाज वाटत होती, तरीपण नाइलाजाने खाली मान घालून तो घरी आला.

राजवैद्य म्हणून दरबारी मान लाभल्याने अजयचे घर राजाने रंगवून, दुरुस्त करून दिले होते. त्याच्या मदतीला नोकर-चाकरही ठेवले होते.

संजय खालच्या मानेने दारात येऊन उभा राहिला. सर्वस्व लुटले गेल्याने चिंता आणि उपासमार यामुळे तो खूप खंगला होता. त्यामुळे आपला भाऊ आला हे अजयला झटकन ओळखता आले नाही.

"अजय, मी आलोय." पुढे होऊन त्याने अजयला मिठी मारली. अजयला आपल्या भावाची ही अवस्था बघून कसंसंच वाटलं.

"काय अवस्था झाली रे तुझी ही !" भरलेल्या डोळ्यांनी अजय उद्गारला.

संजयने मग सगळी हकीगत सांगितली. अजय म्हणाला, "देवाने काय पाहिजे ते माग असे सांगितले त्याच वेळी तुला सांगणार होतो की, लक्ष्मी चंचल असते. आज आहे, उद्या नाही. पण तुला माझा राग आला असता, म्हणून मी काही बोललो नाही."

"बरोबर आहे अजय, त्या वेळी अडथळा आणला असतास तर खरोखरीच तुझा राग आला असता. लक्ष्मी चंचल असते याचे पुरेपूर प्रत्यंतर आले. सरस्वतीच्या उपासनेने तू मात्र वडिलांपेक्षाही नावलौकिक मिळविलास."

संपत्तीच्या तोऱ्यात वेगळा राहिलेल्या संजयची समजूत घालून, अजयने पुन्हा त्याला आपल्या घरी आणलें. राजवैद्य असलेल्या भावाच्या लोकसेवेस संजय मग मनापासून मदत करू लागला.

■

बाल विभाग
२९६९ 3।3।९४
कोवा.

# चोवीस रुपयांचा घोळ

मकरंद तीन वर्षांचा होता त्या वेळी अचानक त्याचे वडील वारले. पैसे होते तोवर काटकसरीने आईने त्याचा सांभाळ केला. आता तो सातवीत होता. शाळेच्या कपड्यांचा, वह्या-पुस्तकांचा असा अनेकपरीने खर्च वाढत होता. त्यातून यंदा तो स्कॉलरशिपला बसणार होता. खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी आईने एका चांगल्या घरी स्वयंपाकाची नोकरी धरली.

सकाळची शिकवणी उरकून घाईघाईने मकरंद घरी येत होता. जेवण आटोपून वेळेवर शाळेत जायला हवं होतं. नेहमीचा मोठा रस्ता सोडून मधल्या वाटेनं तो झपाझप घरी चालला होता. एका पटांगणाच्या कोपऱ्याशी छोट्याशा बागेच्या कडेने ही वाट जात होती. पण मकरंदला तिकडे बघायला सवड नव्हती. सात-आठ मुलींचा घोळका रंगीबेरंगी कपडे घालून हसत, गंमत करीत उभा होता. सुटाबुटात दोन-तीन माणसं उभी होती. मकरंदचं कुणाकडेच लक्ष नव्हतं. त्याला घरी लवकर जायचं होतं. पान तयार ठेवून आई केव्हाची वाट बघत बसली असेल ह्याची त्याला जाणीव होती. खालच्या मानेनं तो त्या गर्दीतून वाट काढत पुढे जाणार तोच सुटाबुटातील एका माणसानं त्याची बकोट धरली. चक्‌चक् असा सगळ्या मोठ्या माणसांनी आवाज केला. मकरंदला काही कळेना. आपण काही केलं नसताना ह्या माणसाने आपणाला का धरावं ? तो मनाशी विचार करतोय तोच त्या

माणसाने त्याच्या कानफटात हाणली. मकरंदच्या डोळ्यांपुढे काजवे चमकले. डोळ्यांतून पाणी आलं. तो काही बोलणार एवढ्यात त्या माणसाने घोगऱ्या शब्दात विचारलं,

"काय रे ए पोरा, दिसतंय की नाही तुला ?"

ओशाळल्या नजरेनं मकरंदने आजूबाजूला पाहिलं. फोटोग्राफर कॅमेरा घेऊन रागानं त्याच्याकडे बघत होता. मग त्याला कळून चुकलं की, ह्या मुलींचा फोटो काढताना आपण मध्ये आलो. अपराध कळल्यावर त्याच्या तोंडून आले, "सॉरी सर !"

"सॉरी काय म्हणतोस, डोळे फुटले होते तुझे ? पैसे कोण भरणार फोटोचे ?" सुटाबुटातील त्या माणसाने त्याची बकोट अजून सोडलेली नव्हती. मग फोटोग्राफरकडे वळून बघत त्याने विचारले,

"किती चार्ज होतोय एका फोटोचा ?"

"चोवीस रुपये." फोटोग्राफर उत्तरला.

"मग काय करणार आता ?"

"सर, देतो आणून मी चोवीस रुपये." खालच्या मानेनं मकरंद उद्‌गारला.

"लगेच हवेत ! पैसे ह्या बंगल्यात आणून द्यायचे नि मग पुस्तकं घेऊन जायची. जा पळ घरी." त्याच्या हातातील सारी पुस्तकं सुटाबुटातील त्या माणसाने काढून घेतली नि त्याला पिटाळलं. रडवेला चेहरा करून खालच्या मानेनं तो घरी निघाला. मागे उभारलेल्या मुलींच्या घोळक्यातून आवाज आला-

"कश्शी गंमत झाली ग त्या मुलाची !" नटून-थटून उभारलेली मुलगी गंभीर आवाजात उद्‌गारली, "अग, आमच्या वर्गातला स्कॉलर मुलगा तो !" तिच्याकडे कुणाचं लक्ष नव्हतं. सगळ्याजणी हसत उभ्या होत्या.

त्यांचं कुत्सित हसणं ऐकून मकरंद आणखीनच ओशाळून गेला.

पान तयार ठेवून आई वाट बघत बसली होती. हातात वह्या-पुस्तके नाहीत, चेहरा रडवेला हे बघून आई त्याच्याकडे बघत राहिली. डोळ्यांत पाणी आणून रडवेल्या आवाजात तो म्हणाला,

"आई, चोवीस रुपये हवेत मला !"

"कशाला रे एवढे ? आणि रडायला काय झालं तुला ?"

मग मकरंदने सगळी हकीगत सांगितली. आईला फार वाईट वाटलं. थोरामोठ्यांच्या माणसांनी एवढ्याशा कारणावरून मुलाला दोषी ठरवायला नको होतं. ठरवलं ते ठरवलं पण मुलाच्या वयाकडं बघून तरी पुस्तकं काढून घ्यायला नको होती. तरी बरं, वेडंवाकडं न बोलता मकरंद 'सॉरी' एवढं म्हणूनच घरी आला होता.

सगळं खरं पण ह्या घटकेला चोवीस रुपये कोठून आणायचे हा तिच्यापुढे प्रश्न होता.

बराच वेळ विचार करून अखेर आई उठली. "थांब थोडं, लगेच येते एवढ्यात !"

थोड्याच वेळात धापा टाकीत आई बाहेरून आली. मकरंदच्या हातावर चोवीस रुपये ठेवत म्हणाली,

"हे दे त्यांना. आणि उणंदुणं काही बोलू नकोस. संध्याकाळी मला यायला थोडा उशीर होईल. काय असेल ते खाऊन घे. मग अभ्यास कर."

'हो' म्हणून पैसे घेऊन धावतच मकरंद बंगल्यावर आला. सकाळचे गृहस्थ धोतर नेसून झोपाळ्यावर वर्तमानपत्र वाचत बसले होते. मकरंदला पाहताच चष्मा काढत त्यांनी विचारलं, "आणलेस का पैसे ?"

"हो." त्याने हातातील नोटा त्यांच्याकडे सोपविल्या. त्या गृहस्थांनी नोटा मोजून बघितल्या. नोकराला हाक मारून त्याची वह्यापुस्तकं परत देऊन टाकली.

"आभारी आहे, सर !"

"जा, पळ आता," ते गृहस्थ त्याच्याकडे बघत घोगऱ्या आवाजात पुटपुटले.

ह्या सगळ्या गडबडीत मकरंदला शाळेला खूपच वेळ झाला. अपराध नसताना चपराक खावी लागली. महिन्याभराची आईची कमाई क्षणभरात खर्ची घालावी लागली. आईलाही विनाकारण ताप झाला; म्हणून राहून राहून त्याला वाईट वाटत होतं. अभ्यासाकडं त्याचं लक्ष लागत नव्हतं.

स्वयंपाकासाठी आई दुपारी चार वाजताच गेली. बंगल्यात आल्यावर मालकीणबाई म्हणाल्या,

"काकू, पंधरावीस माणसं जेवायला यायची आहेत. घरी पिंटीचा वाढदिवस आहे. तिच्या मैत्रिणीही यायच्या आहेत. पुऱ्या, मसालेभात. श्रीखंडासाठी चक्कासुद्धा आणलाय. आणखीन काय लागतं बघा, म्हणजे तयारी करून देते !"

बाई चांगल्या, मकरंदच्या आईला हवं-नको बघून स्वतः मदत करीत होत्या. शिवाय बाहेरही पाहुणे मंडळी, पिंटीच्या मैत्रिणी यांची बैठकीची व्यवस्था अधून मधून करून घेत होत्या.

बरोबर आठ वाजता मंडळी पानावर बसली. बाईंच्या मैत्रिणी वाढायला मदत करत होत्या. मकरंदच्या आईच्या पुऱ्या तळून झाल्या. मग हात धुऊन तीही वाढायला लागली.

"स्वयंपाक छान झालाय हो, काकू ! सगळीजणं खूष आहेत. साहेबांनी तर ए वन रिपोर्ट दिलाय !" बाईंच्या बोलानं मकरंदच्या आईला समाधान वाटलं. मसालेभाताचं ताट घेऊन वाढायला ती बाहेर आली. साहेब जोरजोरात गप्पा मारीत होते.

"फोटो सगळे चांगले आले असते. मध्येच एक पोरगं कडमडलं. पण अण्णासाहेब, रुपये चोवीस वसूल केले त्या पोराकडून. बाकी पिंटीचा वाढदिवस मात्र फक्कड साजरा झाला आज !"

अण्णासाहेब मान डोलावून हो हो म्हणत होते.

मकरंदच्या आईने हे ऐकलं. भातानं भरलेलं ताट घेऊन ती तशीच आत आली. ताट खाली ठेवून पदरानं डोळे पुसले.

वाढदिवस समारंभ झाला. सगळे पाहुणे गेले. आग्रह करूनही मकरंदची आई जेवली नाही. विलक्षण बेचैन झाली होती ती. जायला निघाली तोवर साहेब आत आले.

"काकू, स्वयंपाक बरीक छानच झाला होता हो ! सगळी मंडळी खूष झाली एकदम."

"मी तेच म्हणते. रोज नाही निदान आज तरी जेवून जा म्हणत होते मी !" बाई उद्‌गारल्या.

"नको बाई, वेळ झालाय. घरी जायला हवं !"

"मग पैसे देते थांबा !"

"कसले पैसे ?"

"आजच्या जादा कामाचे !" मग बाई साहेबांच्याकडे हात पसरीत म्हणाल्या, "पंचवीस रुपये द्या."

बंडीच्या खिशात हात घालून साहेबांनी नोटांची घडी काढली. "चोवीस रुपये आहेत. एक रुपया तुझ्याकडचा घे !"

"अगोबाई, ह्या तर सकाळी काकूंना दिलेल्या नोटा ! चोवीस रुपयेच दिले होते त्यांना !"

"म्हणजे ?"

"अहो, त्यांना गरज होती म्हणून मागायला आल्या होत्या. ह्या तुमच्याकडं कशा आल्या ?"

"एका मुलानं आणून दिल्या."

"बाई, देताय कशाला मला ! सकाळी घेतलेले चोवीस रुपये तसेच वळते करून घ्या म्हणजे झालं !"



चोवीस रुपयांचा हा घोळ बघून साहेब चक्रावून गेले. न राहवून त्यांनी विचारलं, "काकू, तुम्हाला मुलं किती ?"

"एकच मुलगा आहे."

"केवढा ?"

"सातवीत आहे यंदा."

हे ऐकल्यावर तर ते अंतर्बाह्य अस्वस्थ झाले. आपण सकाळी ज्या मुलाला मारलं तो काकूंचा मुलगा तर ! अगदीच अयोग्य वागलो आपण. पैसेही घ्यायला नको होते. मग पश्चात्तापानं ते म्हणाले,

"काकू, निष्कारण त्रास दिला मी तुमच्या मुलाला ! तुम्हालाही खूप यातना झाल्या असतील चोवीस रुपयांपायी. कामाच्या निमित्तानं तुम्ही घरी आलात म्हणून मला समजलं तरी ! नाहीतर गरीब कुटुंबाचे पैसे घेऊन बसलो असतो मी. बाई, काकूंना पैसे देऊन टाक ते. क्षमा करा काकू, तुम्हाला खूप त्रास झाला ! त्या कोवळ्या मुलालाही खूप त्रास झाला असेल."

"नाही साहेब, तसं नाही. चूक झाली असेल तर शिक्षा झालीच पाहिजे. त्यात गरीब-श्रीमंताचा काय प्रश्न !"

"मुलगा गडबडीत होता, काकू. मीच मुर्दाडासारखा वागलो. शाळकरी पोर. त्याला काय समजतंय ! मी त्याला मारलं तरी वेडंवाकडं बोलला नाही. चुकलो सर म्हणून खालच्या मानेनं उभा होता. पैसे परत करायची बुद्धी व्हायला हवी होती मला. असो, निदान आता तरी मदत करायला मिळते हेच समाधान !"

मकरंदची आई नको म्हणत असताना साहेबांनी बाईंना पैसे द्यायला लावले.

पुढे आईच्या पगारात वाढ झालीच, पण मकरंदच्या सोज्वळ वागण्याकडे व अभ्यासातील हुशारीकडे बघून त्याच्या शिक्षणाची सारी जबाबदारी साहेबांनी स्वतःकडे घेतली.

■

# विचित्र न्याय

शांतीनगरचा राजा विश्वजितसिंह न्यायदानाच्या बाबतीत प्रसिद्ध होता. शांतता आणि समृद्धी असल्याने राज्यातील प्रजा सुखी होती. त्यामुळे खून, मारामारी, चोऱ्या असे प्रकार त्याच्या राज्यात फारसे घडायचे नाहीत. एखादे वेळी भांडणतंटा विकोपाला गेला की, न्याय मिळवण्यासाठी लोक राजाकडे येत. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेऊन योग्य असा न्याय राजा देई. त्यामुळे कुणावरही अन्याय होत नसे. तंटा घेऊन आलेले लोक राजाने दिलेला निकाल मान्य करून समाधानाने परत जात.

न्यायदान पद्धतीमुळे शांतीनगरच काय पण बाहेरील राज्यातही राजाची कीर्ती पसरली होती.

एकदा नगरात एक विचित्र घटना घडली. शीलवती नावाच्या एका गरोदर स्त्रीने गळफास लावून घेऊन आत्महत्या केली. तिचा नवरा राम आणि त्याची म्हातारी आई डोक्याला हात लावून रडत बसली. शेजारी लोक रामच्या घराभोवती जमले. सगळ्यांना आश्चर्य वाटत होतं. रामचं आणि शीलवतीचं एकमेकांवर प्रेम होतं. अलीकडे सासू-सुनेची कधीतरी भांडणं व्हायची. तरीपण गळफास लावून घेण्यासारखं काही कारण नव्हतं.

जमलेले लोक आपापसात कुजबुजत होते. आत्महत्या नसून खून असावा असाही लोक संशय घेत होते.

राजाच्या दूतांनी आत्महत्येची ही वार्ता त्याच्या कानावर घातली. खुनाचा संशय व्यक्त करणारी लोकांची कुजबूजही राजाला ऐकदली. ह्या घटनेमुळे राजाची झोप पार उडाली. आत्महत्या करून घेतली म्हटले तरी, शीलवतीला असा काय मानसिक त्रास झाला असावा ? आणि खून झाला असेल तर तो कोणी आणि का केला असेल ? राजा स्वतःशीच विचार करू लागला. एखाद्या घटनेचा संशय येऊ लागला की, त्याचे निराकरण करून घ्यायचे अशी राजाची सवय होती.

राजाने शीलवतीच्या घरावर टेहळणी करण्यासाठी दूत पाठविले. पाठोपाठ शीलवतीच्या प्रेताची बारकाईने तपासणी करण्यासाठी राजवैद्यांनाही पाठविले.

जमलेल्या लोकांच्या मदतीने शीलवतीचे प्रेत स्मशानात न्यायची रामची तयारी चालली होती. आजूबाजूला पाहत त्याची आई रडत होती. प्रेत हलविणार एवढ्यात राजवैद्य तिथं आले. त्यांच्याबरोबर आणखी एक दूत होता. बांधलेले प्रेत सोडताना रामा आणि त्याची आई अस्वस्थ झाली होती. तरीपण तशातच दुःखी चेहऱ्याने ते रडत होते. राजवैद्याबरोबरचा दूत बारकाईने हे सर्व पाहत होता.

राजवैद्यांनी प्रेताची बारकाईने तपासणी केली. मग ते स्मशानात न्यायला सांगितले.

दहापंधरा दिवस असेच गेले. राजवैद्यांच्या तपासणीवरून शीलवतीने आत्महत्या केलेली नव्हती. तिला फास लावून मारण्यात आले होते. प्राण वाचवण्यासाठी तिने झटापट केलेली होती.

शीलवतीच्या मृत्यूला कारणीभूत असणाऱ्या व्यक्तीला शासन होणे भाग होते. राजा त्या दृष्टीने अभ्यास करत होता. रामा आणि त्याची आई ह्या दोघांनी मिळून शीलवतीला फास आवळला असावा हे आत्तापर्यंतच्या तपासणीवरून राजाला कळून चुकले होते. तथापि त्याचे

मन त्याला स्वस्थ बसू देत नव्हते. खून उगीच कोणी करणार नाही. त्यामागे काही कारण हे असणार. कदाचित शीलवतीची अक्षम्य चूक असणेही शक्य होते आणि तसे असेल तर रामा आणि त्याची आई या दोघांवरही अन्याय होईल. तेव्हा याबाबत बारकाईने शोध घेणे इष्ट होते.

अखेर राजाने साधूमहाराजांचा वेष घेतला. तो रामाच्या घरी आला. चेहरे दुःखाऐवजी भीतीने ग्रासलेले दिसत होते. दारात साधूमहाराज उभे आहेत, हे बघून रामाची आई तांदूळ घेऊन बाहेर आली.

"आजीबाई, मी फार लांबून आलोय. थोडी विश्रांती घ्यावी, चार घास खावेत आणि मग पुढच्या यात्रेला जावं असा विचार आहे. तांदूळ घेऊन काय करू मी !"

साधूमहाराजाच्या बोलण्यानं रामाच्या आईला थोडा धीर आला. तिने बसायला पाट घातला. प्यायला पाणी दिले. मग ती स्वयंपाकाच्या तयारीला लागली.

रामाची आई स्वयंपाक करत होती. साधूमहाराज मोकळेपणानं तिच्याशी बोलत होते. हवी ती माहिती काढून घेत होते. भूत-भविष्य सर्व काही आपल्याला ज्ञात आहे हे सांगताच रामाची आई दडवून न ठेवता सारं काही सांगत होती.

जेवण होईपर्यंत साधूमहाराजांनी जरूर ती सारी माहिती मिळवली.

पंधरा दिवस होऊन गेले, पण शीलवतीच्या मृत्यूची चौकशी झाली नाही. लोक आपापसात कुजबुजत होते. न्यायदानात कीर्ती असलेले महाराज स्वस्थ कसे असेही बोलले जात होते. महाराजांनी दुर्लक्ष केलं आहे. अशा तऱ्हेनं काणाडोळा झाला तर राज्यात अनागोंदी माजायला वेळ लागणार नाही, असं म्हणून महाराजांना दूषण देत होते.

प्रजाजनात अशी उलटसुलट चर्चा चाललेली असताना महाराजांनी फ़र्मान काढलं. गळफास लावून शीलवतीने जीव दिला त्याची सर्व



BVBK-0402969

प्रजाजनांसमोर चौकशी सुरू झाली. रामा आणि त्याची आई ह्यांना मृत्युदंड होतोय की काय अशी साऱ्यांना शंका होती. महाराज कसा काय न्याय देतात हे पाहण्यासाठी लोक दाटीवाटीने जमले होते.

रामाची आई, रामा ह्यांना हात बांधून दरबारात आणलं. त्याशिवाय नगरातील एक ज्योतिषबुवांनाही मुसक्या बांधून महाराजांपुढे उभं करण्यात आलं. 'अरे, ह्या ज्योतिषाचा काय संबंध ?' सारेजण चुळबुळ करत पुटपुटत होते.

"आजी, सूनबाईंनी गळफास का लावून घेतला ?" महाराजांनी प्रश्न केला.

"माहिती नाही महाराज, मला !"

"तू सांग, रामा ?"

"माहिती नाही, महाराज."

"ज्योतिषीबुवा, तुम्हाला माहिती आहे ?"

"माझा काय संबंध, महाराज ?"

"ठीक आहे. तुम्हापैकी कुणालाच माहिती नाही. गरोदर होती. मूलबाळ नको असावं म्हणून तिने फास लावून घेतला असावा. होय ना !" महाराज तिघांकडे नजर लावून पाहत म्हणाले.

"हो, तसंच असावं, महाराज !" तिघांनीही सुटकेचे निःश्वास टाकले.

प्रजाजनांकडे शांतपणे पाहत महाराज म्हणाले, "आमच्या नगरात असलं हे निंद्य कृत्य घडलंच कसं ह्याचं मला फार दुःख होत आहे. त्यातून प्रत्येक जण मला माहिती नाही म्हणून नाकबूल होतो आहे. ह्याचं आणखीन दुःख होतंय. अपराध्याला शिक्षा ही झालीच पाहिजे !" मग महाराजांचा आवाज चढत गेला. क्रोधाने डोळे त्या तिघांवर रोखत ते उद्‌गारले,

"तुम्हापैकी आपण होऊन कोण कबूल होईल त्याला शिक्षेतून सूट मिळेल. दडवून ठेवायचा प्रयत्न करील तर मिळणाऱ्या शिक्षेत भरच